# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक:- ८५-२३** **दिनांक :- १६/०३/२०२३**

## ०७ वर्षापासुन खुनाचे गुन्हयात पाहिजे असलेल्या आरोपीतास उत्तर प्रदेशातुन अटक गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिरा यांची कामगिरी.

नयानगर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०९/०७/२०१६ रोजी ०७.०० वा चे पुर्वी इसम नामे रईस रोशन अन्वर हुसेन यास आरोपीत नामे शानु कालिया उर्फ शाहनवाज आयज अहमद, सोहेल शेख, नौशाद ऊर्फ अली इर्शाद शेख खान व असद अहमद सिध्दीकी यांनी पुर्वीच्या वादाचा राग मनात धरुन जिवे ठार मारुन पुरावा नष्ट केल्याबाबत नयागनर पोलीस ठाणेत तक्रार प्राप्त झाल्याने गुन्हा रजि. नं. २२०/२०१६ भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१, ४०४, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयात यापुर्वी १) शानु कालिया उर्फ शाहनवाज आयज अहमद, २) सोहेल शेख, ३) नौशाद ऊर्फ अली इर्शाद शेख खान यांना अटक करण्यात आली होती व गुन्हयात पाहीजे आरोपीत असद अहमद सिध्दीकी यांचा शोध घेणे चालु होते.

सदर गंभीर गुन्हयातील पाहिजे आरोपीत असद अहमद सिध्दीकी याचा गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांचेकडून समांतर तपास चालु असताना गुन्हयातील पाहिजे आरोपी असद अहमद सिध्दीकी हा गुन्हा केले पासुन कौशंबी, राज्य उत्तरप्रदेश येथे राहत असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा यांना मिळाल्याने पो.नि.श्री. अविराज कुराडे यांनी स.फौ. किशोर वाडीले, पो.हवा. पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, पो.अंम. प्रशांत विसपुते यांचे पथक नेमुन पाहिजे आरोपी असद अहमद सिध्दीकी वय ४१ वर्षे यास जिल्हा कौसुंबी, राज्य उत्तरप्रदेश येथुन दिनांक १३/०३/२०२३ रोजी ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास नयानगर पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमिराचे पो.नि. श्री. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, स.फौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पो.हवा. संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, विजय गायकवाड, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, सचिन सावंत, समीर यादव, पो. अंम. प्रशांत विसपुते, सनी सुर्यवंशी तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम. सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.



----oooo----